Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Issue – II March – April 2022

नवीन राष्ट्रीय धोरणामधील शिक्षक शिक्षणातील बदलातील आव्हाने

डॉ. अजय भगवान साळी
सहयोगी प्राध्यापक
एस.एम.टी. शासकीय कॉलेज ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर

प्रस्तावना :

भारतात सक्षम नागरिक बनविण्यासाठी केंद्र सरकारने अनेक आता पर्यंत विविध धोरणे राबविण्याचा प्रयत्न केला आहे. प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षण कसे असावे याबाबत 1986 च्या धोरणात नमूद करण्यात आले होते. तेव्हा पासून आज पर्यंत शैक्षणिक धोरणात प्राप्त परिस्थितीनुसार बदल करण्यात आले आहेत. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे तेव्हाचे शिक्षण मंत्री मौलाना आझाद यांनी देशात समान शैक्षणिक पध्दत चालू करून केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली आणले. त्यांनी शिक्षणात आधुनिकता आणण्यासाठी विद्यापीठ आयोग, डॉ. राधाकृष्ण आयोग तसेच मुदलियार आयोग प्रस्तावित करण्यात आलेत.

भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी 1961 साली राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण ही स्वायत्त संस्था स्थापन केली. सदर संस्था भारतातील शालेय शिक्षण संदर्भातील सर्व समस्यांबाबत अभ्यास करते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986 च्या शैक्षणिक धोरणांच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी ईश्वरभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली ईश्वरभाई पटेल यांच्या पुर्वलोकन समितीची स्थापना करण्यात आली.

1986 मध्ये देशातील संपूर्ण शैक्षणिक संस्थासाठी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले. या शैक्षणिक धोरणात समान शिक्षणसंधी यावर भर देण्यात आला. या धोरणामुळे अनेक मुक्त विद्यापीठांची स्थापना झाल्यामुळे ग्रामीण भागापर्यंत शिक्षण पोहचण्यास मदत झाली. तसेच अनेक लोक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील झाल्याचे दिसून येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात 1989 साली नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली.

Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed based on a work at *http://www.goeiirj.com*

शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीने राष्ट्रीय धोरण 1996 मध्ये प्रसिध्द केले. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी 2005 मध्ये किमान समान कृतिशील कार्यक्रमाधारित नवे

शैक्षणिक धोरण आखले गेले. यामध्ये व्यावसायिक व तांत्रिक कार्यक्रमांसाठी देश भरात समान प्रवेश प्रक्रिया चालू केली. तसेच 2009 मध्ये निरक्षर व नवसाक्षरांसाठी ही केंद्र शासनपुरस्कृत शैक्षणिक योजना सुरू करण्यात आली.

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान ही राज्याच्या उच्च शिक्षणात सुधारणा करण्यासाठी वास्तू उभारणीसाठी नियोजन नियंत्रण करणारी मोहीम केंद्र शासनाने 2013 मध्ये सुरू केली. त्यामुळे राज्यातील दर्जेदार विद्यापीठे व महाविद्यालयांना स्वायत्तता देऊ केली. या निर्णयामुळे देशातील व परदेशातील विद्यापीठे व महाविद्यालय शैक्षणिक देवाण–घेवाण चालू झाल्याचे निदर्शनास येत आहे.

2014 नंतर विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्वीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी 2016 मध्ये माजी केंद्रीय सचिव टी.एस.आर.सुब्रम्हण्यम यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय धोरण समिती नेमली. या समितीने पुढील समितीचा आढावा घेतला–

1. डिस्ट्रिक्ट प्रायमरी एज्युकेशन पोग्रॅम (डीपीईपी)
2. सर्व शिक्षा अभियान (एसएसइ 2001)
3. राईट टू एज्युकेशन
4. नॅशनल प्रोग्रॅम फॉर एज्युकेशन फॉर गर्ल्स ॲट एलिमेंटरी लेव्हल
5. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान
6. माध्यमिक स्तरावर अपंगांसाठी इन्क्लुजीव एज्युकेशन फॉर दि डिसेबल्ड फॉर सेकंडरी स्टेज
7. प्रौढ साक्षर भारत
8. उच्च शिक्षण विकासासाठी राष्ट्रीय उच्चतर अभियान (रूसा 2013)

या धोरणामुळे प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही पूर्वीच्या योजनांशी जोडल्यास युवा विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे व सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शक्य होणार आहे. या धोरणात संशोधनावर जास्तीत जास्त भर देण्यात येणार आहे. या धोरणात विद्यार्थ्यांमध्ये स्वत :च्या पायावर उभा रहाणे, गुणवत्ता वाढविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्याच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देणे, इत्यादीवर भर दिला आहे.

या धोरणात पाच सूत्रांवर भर देण्यात आला –

1. सर्वांना शिक्षण
2. चांगले शिक्षण
3. शिक्षणाची समान संधी
4. आवाक्यातील शिक्षण
5. शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांचे उत्तरदायित्व निश्चित करणे.

या पाच नवीन शैक्षणिक धोरणाचा पाया राहणार असल्यामुळे ही पाच शैक्षणिक धोरणाची पूर्तता करण्यासाठी अनेक आव्हाने आहेत. त्यामधील शिक्षक शिक्षण यास्तरावर येणा•या आव्हानांचा अभ्यास करणार आहोत.

मुख्यउद्देश : "शिक्षक शिक्षण प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल करून बहुशाखीय महाविद्यालयामध्ये व विद्यापीठामध्ये शिक्षक प्रणाली राबवून आणि सर्व शालेय शिक्षकांसाठी चार वर्षाचा एकीकृत केलेचा बॅचलर पदवी अभ्यासक्रम अस्तित्वात आणून शिक्षकांना साहित्य, अध्यापनशास्त्र व सराव यामध्ये सर्वोच्य दर्जाचे प्रशिक्षण दिले जात असल्याची दक्षता घेणे."

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2019 मध्ये शिक्षक शिक्षण या स्तरामध्ये चांगल्या प्रकारच्या तरतूदी व आदर्शात्मक मांडणी केल्याचे दिसून येत परंतु सध्याची अध्यापक महाविद्यालय समोर अनेक आव्हाने निर्माण झाल्याचे दिसून येते. त्या बाबत कोणते नियोजन करावे याचे मार्गदर्शन सदर शैक्षणिक धोरणात दिसून येत नाही. अध्यापक महाविद्यालयात खालीलप्रमाणे आव्हाने निर्माण झालेली आहेत.

एनसीटीई व युजीसीने अध्यापक महाविद्यालयांना स्वतंत्र महाविद्यालयाचा स्वतंत्र दर्जा प्राप्त करून दिलेला आहे. त्यामुळे त्याच परिसरातील बहुशाखीय महाविद्यालयांना अध्यापक महाविद्यालय जोडताना दिलेल्या स्वतंत्र दर्जाच्या अस्तित्वाचे काय असा प्रश्न निर्माण होतो.

1. बहुशाखीय महाविद्यालयास अध्यापक महाविद्यालय जोडल्यास एनसीटीईच्या प्रमाणंका प्रमाणे तयार केलेली अध्यापक महाविद्यालयाची इमारत, क्रीडांगण, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, भाषा प्रयोगशाळा, संगणक कक्ष, इत्यादी बाबीवर आज पर्यंत केलेल्या आर्थिक खर्चाचे तसेच निर्माण झालेल्या सर्व इन्फ्रास्ट्रक्चरचे करावयाचे काय याबाबत मार्गदर्शन दिसून येत नाहीत.
2. बहुशाखीय महाविद्यालय अध्यापक महाविद्यालय जोडल्यास अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांची रितसर विद्यापीठामार्फत निवड झालेली असेल तर त्या प्राचार्यांचा हुद्दा, पद, वेतन याबाबत मार्गदर्शन दिसून येत नाहीत.
3. बहुशाखीय महाविद्यालयास अध्यापक महाविद्यालय जोडल्यास शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या पदांची रचना कशी असावी याबाबत मार्गदर्शन दिसून येत नाहीत.
4. एकाच परिसरात दोन शिक्षण संस्थेची दोन वेगवेगळी महाविद्यालये असतील तर ती दोन महाविद्यालये कशी समाविष्ट करावीत याबाबत मार्गदर्शन आवश्यक असल्याचे दिसून येते.
5. एकाच परिसरात एकाच शिक्षण संस्थेची दोन्ही महाविद्यालये असतील त्यापैकी बहुशाखीय महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त झालेला असेल तर अध्यापक महाविद्यालय कसे जोडावे याबाबत मार्गदर्शक आवश्यक आहे.

6. एकाच परिसरात एकाच शिक्षण संस्थेची दोन्ही महाविद्यालये असतील त्यापैकी एक महाविद्यालय फक्त महिलासाठी असेल तर दुसरे महाविद्यालय कोएज्युकेशनचे असेल तर दोन्ही महाविद्यालय जोडताना कशी जोडावी याबाबत मार्गदर्शक तत्त्वे दिसून येत नाहीत.
7. एकाच परिसरात एकाच शिक्षण संस्थेची दोन्ही महाविद्यालये असतील त्यापैकी एक अध्यापक महाविद्यालय अनुदानित तत्त्वावर चालत असेल तर दुसरे बहुशाखीय महाविद्यालय विनाअनुदानित तत्वावर चालत असेल तर अध्यापक महाविद्यालय कोणत्या अनुदान तत्त्वावर चालणार याबाबत मार्गदर्शक तत्त्वे दिसून येत नाहीत.
8. ग्रामीण भागात एकच अध्यापक महाविद्यालय असेल आणि त्या परिसरात बहुशाखीय महाविद्यालय नसेल आणि तर अशा अध्यापक महाविद्यायांने करावयाचे काय याबाबत मार्गदर्शन दिसून येत नाही.
9. चार वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन पदवी चा अभ्यासक्रम शालेयपूर्व पासून माध्यमिक स्तरा पर्यंत चालणार आहे. त्यामुळे 2030 नंतर अध्यापक विद्यालयाचे (डी.एल.एड.) अस्तित्वाचे काय असा प्रश्न निर्माण होत आहे त्यांना कोणत्या स्तरामध्ये समाविष्ट करावे याबाबत मार्गदर्शक तत्त्वे दिसून येत नाहीत.
10. म्हाराष्ट्रात एकात्मिक बॅचलर ऑफ एज्युकेशन पदवीपूर्व अभ्यासक्रम चालू आहे. सदर अभ्यासक्रम काही बहुशाखीय महाविद्यालयात चालू आहे. येथे बारावी नंतर सीईटी मार्फत प्रवेश मिळतो. मात्र एखादा विद्यार्थी बारावी विज्ञान शाखेतून प्रवेश घ्यावयाचा असेल आणि महाविद्यालयात विज्ञान विषयाची सोय नसेल तर सदर विद्यार्थ्यांची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.
11. सध्याची अध्यापक महाविद्यालय शासकीय, शासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित तत्त्वावर चालू आहेत. त्यांना बहुशाखीय महाविद्यालयांना जोडताना कोणत्या अनुदान प्रकारानुसार महाविद्यालये जोडावे याबाबत मार्गदर्शन केल्याचे निदर्शनास येत नाही.
12. एखाद्या शिक्षण संस्थेचे फक्त अध्यापक महाविद्यालय एकच असेल तर त्यांनी कोणत्या शिक्षण संस्थेच्या बहुशाखीय महाविद्यालयास जोडावे याबाबत मार्गदर्शन दिल्याचे दिसून येत नाही.

समारोप :

वरील सर्व मुद्दाचे अवलोकन केले असता. वरील काही समस्या अध्यापक महाविद्यालयामध्ये निर्माण होणार आहेत. सदर निर्माण झालेली आव्हाने विद्यापीठ, महाराष्ट्र शासन,

केंद्र शासन, एनसीटीईने अवलोकनार्थ घेण्यात याव्यात. अशी अपेक्षा प्रस्तुत संशोधक सदर लघु संशोधन पेपर मधून व्यक्त करीत आहे.

संदर्भ :

1. नागपूरे व. रा. – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 1986 प्रकाशक : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, मे 1987.
2. राष्ट्रीय शिक्षण धोरण, 2019 मसुदा.
3. उच्च शिक्षण : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मसुदा 2019 युटयुब– 12 जुलै 2019